प्रबोधन
गोरेगांव

# प्रथम वार्षिक अहवाल
१९७२–७३

# 'प्रबोधन' गोरेगांव

संस्था नोंदणी कायदा १८६० अन्वयें नोंदलेली संस्था ( Regn. No. Bom 49/72 GB BSD )
मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० अन्वयें नोंदलेली संस्था ( Regn. No. F 2502 Bom. )

★

अध्यक्ष : श्री. निळकंठ ज. सावंत
उपाध्यक्ष : डॉ. अनंत शेट्ये जी. एफ. ए. एम.
श्री. शरद गुप्ते बी. ए.

## कार्यकारी मंडळ
( १९७२ ७३ )

कार्याध्यक्ष : श्री. पद्माकर देसाई बी. एससी. ( ऑ. )
प्रमुख कार्यवाह : ,, सुभाष देसाई
सह कार्यवाह : ,, वसंत तावडे बी. ए.
,, बाळकृष्ण साटम
कोषाध्यक्ष : ,, मुकुंद चव्हाण

## -: सभासद :-

श्री. सदाशिव तावडे
,, मनोहर अदवानकर एम. एससी.
,, सुरेश सैतवडेकर
,, मधुसूदन भिडे
,, गणपतराव सारंग जी. डी. आर्ट

श्री. सोपानदेव राणे
,, सुरेश चव्हाण बी. ए.
,, रमेश म्हात्रे
,, महादेव खानोलकर
,, रघुनाथ परब

अंतर्गत हिशेब तपासनीस
श्री. रामचंद्र जोशी बी. कॉम.

सनदी लेखापाल : मेसर्स ढेरे आणि रायकर

बँक : दि सारस्वत को-ऑ. बँक लि., गोरेगांव

पत्रव्यवहार :
द्वारा : सुभाष देसाई, प्रमुख कार्यवाह
३००/२३८२, मोतीलालनगर विभाग २,
महात्मा गांधी मार्ग, गोरेगांव (पश्चिम),
मुंबई-४००-०६२.

संपर्क :
न्यू स्टँडर्ड पेन्टस,
फिल्मिस्तान जवळ, स्वामी विवेकानंद मार्ग,
गोरेगांव ( प. ), मुंबई-४००-०६२.
दूरध्वनि : ६९४१५७

प्रबोधन : ज्ञान • कला • सेवा

# 'प्रबोधन' गोरेगांव

## पहिली वार्षिक सर्वसाधारण सभा

'**प्रबोधन गोरेगांव**' या संस्थेची पहिली वार्षिक सर्वसाधारण सभा **रविवार दि. २७ मे १९७३ रोजी सकाळी ९-०० वा.** केशव गोरे स्मारक सभागृह आरे मार्ग, गोरेगांव (पश्चिम), मुंबई-६२ येथे आयोजित करण्यात आली आहे. या सभेस सर्व सभासदांनी वेळेवर उपस्थित रहावे ही विनंती.

**सभेपुढील कामकाज :—**

१. प्रास्ताविक

२. सन १९७२-७३ चा वार्षिक अहवाल, आयव्यय पत्रक व ताळेबंद (हिशेब तपासनीसांच्या अहवालासह) वाचून मंजूर करणे.

३. कार्यकारी मंडळाने सुचविलेल्या परिशिष्ट 'अ' प्रमाणे घटनादुरुस्तीवर विचार करुन निर्णय घेणे.

— कॉ फी पा न —

४. नवीन वर्षाकरिता (१९७३-७४) घटनेच्या कलम ७ (ई) प्रमाणे अध्यक्ष (१ जागा), उपाध्यक्ष (२ जागा) व कार्यकारी मंडळावरील निवृत्त झालेल्या ४ सभासदांच्या जागी नवीन सभासदांची निवड करणे. (एकूण ७ जागा)

५. नवीन वर्षाकरितां अंतर्गत हिशेब तपासनीस व सरकारमान्य हिशेब तपासनीस यांची नेमणूक करणे.

६. अध्यक्षांचे अनुमतीने आयत्यावेळीं सभेपुढे येणारी कामे.

कार्यकारी मंडळाच्या आज्ञेवरुन,

**पद्माकर देसाई**

कार्याध्यक्ष

**सुभाष देसाई**

प्रमुख कार्यवाह

गोरेगांव, मुंबई ६२.

दिनांक १० मे १९७३

---

**विशेष सूचना :** १) संस्थेचे जमाखर्च सभासदांच्या अवलोकनार्थ कोषाध्यक्ष, द्वारा श्री. **वसंत तावडे**, बी १६/८ महापालिका वसाहत, गोरेगांव (पश्चिम) येथे दिनांक २१-५-७३ ते २३-५-७३ पर्यंत रोज रात्री ८ ते ९ पर्यंत ठेवण्यात येतील.

२) कोणाहि सभासदास त्या बाबतीत काही सुचना करावयाच्या असल्यास त्या लेखी दि. २५-५-७३ पूर्वी कार्याध्यक्षांकडे सादर कराव्यात.

३) गणसंख्येच्या अभावी वरील सभा तहकूब झाल्यास, तहकूब झालेली सभा त्याच ठिकाणी अर्ध्यातासानंतर घेण्यात येईल. व अशा सभेस गणसंख्येची आवश्यकता राहाणार नाही.

४) निवडणूकीस उभे राहू इच्छिणाऱ्या सभासदांनी आपले लेखी अर्ज दिनांक २३-५-७३ पूर्वी बी १६/८ महापालिका वसाहत येथे रात्री ८ ते ९ या वेळेत आणून द्यावेत. अर्जाचा नमूना याच ठिकाणी उपलब्ध आहे.

# 'प्रबोधन' गोरेगांव

स्थापना : गुरुवार दि. १६ मार्च १९७२

(गुढीपाडवा)

## उद्देश

धर्म, पंथ, भाषा अगर जातीचा विचार न करता राजकारणापासून संपूर्णपणे अलिप्त राहून सांस्कृतिक, शारिरीक, शैक्षणिक व बौध्दिक प्रगती साधणे.

या करीता :-

१) व्याख्याने व व्याख्यानमाला आयोजित करणे.

२) ग्रंथ व वाङमय विषयक चर्चा घडवून आणणे आणि लेखन व वक्तृत्वाच्या स्पर्धा आयोजित करणे.

३) शारिरीक उन्नती घडवून आणण्याकरीता क्रिडासामने, क्रिडामहोत्सव आयोजित करणे व व्यायामशाळा स्थापणे.

४) नाट्य, संगीत व नृत्य इत्यादी कलांना उत्तेजन देण्याकरीता कार्यक्रम आयोजित करणे.

५) विद्यार्थ्यांना मार्गदर्शन व सहाय्य उपलब्ध करुन देणे आणि संदर्भ ग्रंथालये स्थापणे व चालविणे.

६) संमेलने, प्रदर्शने व शैक्षणिक सहली आयोजित करणे.

## सभासदत्व

संस्थेचे नियम मान्य असणाऱ्या व संस्थेच्या सभासदत्वाचा अर्ज भरुन देणाऱ्या १८ वर्षावरील कुणाही व्यक्तिस संस्थेचे पुढील प्रमाणे सभासद होता येईल.

**प्रवेश शुल्क** : रु. २/-

१] **आश्रयदाते** : रु. २०१/- किंवा अधिक वर्गणी देणारे.

२] **आजीव सभासद** : रु. १०१/- वर्गणी देणारे.

३] **साधारण सभासद** : रु. १०/- वार्षिक वर्गणी देणारे.

सभासद होऊ इच्छिणाऱ्या व्यक्तिने सभासदत्वाचा छापिल अर्ज भरुन वर्गणीसह दिला पाहिजे. अर्जावरील सूचक व्यक्ति ही संस्थेची सभासद असली पाहिजे.

# प्रबोधन गोरेगांव

## प्रथम वार्षिक अहवाल
## १९७२–७३

'प्रबोधन गोरेगांव' च्या दि. ३१ मार्च १९७३ रोजी पूर्ण झालेल्या प्रथम वर्षातील कार्याचा अहवाल आणि हिशेबपत्रके सादर करताना कार्यकारी मंडळास आनंद होत आहे.

**स्थापना :**

या विभागातील उत्साही व सेवाभावी तरुणांनी एकत्र येऊन '**प्रबोधन गोरेगांव**' या संस्थेची गुढीपाडव्याच्या शुभ मुहूर्तावर (गुरुवार दि. १६ मार्च १९७२) स्थापना केली. **संस्था नोंदणी कायदा** १८६० प्रमाणे तसेच **मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम** १९५० प्रमाणे ही संस्था रितसर नोंदविण्यात आली. **ज्ञान-कला-सेवा ही** संस्थेच्या कार्याची मार्गदर्शक त्रिसूत्री निश्चित करण्यात आली व या तीन शब्दांनी युक्त असे मार्मिक बोधचिन्ह निवडण्यात आले.

**सभासद :**

या वर्षअखेर संस्थेचे ३ आश्रयदाते, २७ आजीव सभासद व १२६ साधारण सभासद असे एकूण १५६ सभासद झाले.

**कार्यकारी मंडळाच्या सभा :**

वर्षभरात कार्यकारी मंडळाच्या एकूण १४ सभा घेण्यात आल्या. सभेला सरासरी उपस्थिती ९ होती. या सभांमधून संस्थेच्या ध्येयधोरणांनुसार कार्यक्रमांची रुपरेषा आखणे, अंदाजपत्रके व जमाखर्च मंजूर करणे इत्यादि विषयांवर चर्चा होऊन निर्णय घेण्यात आले. पहिल्या वर्षापासूनच काही महत्वाकांक्षी व नाविन्यपूर्ण उपक्रम सुरु करण्यात आले.

**कार्यक्रम :**

हे वर्ष संस्थेचे प्रारंभाचेच असल्यामुळे स्थापना, सभासद नोंदणी, साधन सामुग्रीची जुळवाजुळव इत्यादि कार्याचा व्याप प्रचंड होता. तरीसुद्धा अहवालसाली आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमांची संख्या, भव्यता व गुणवत्ता उच्चप्रतीची होती. कार्यक्रम निश्चित करतांना केवळ करमणूकीला प्राधान्य न देता उपयुक्तता व नाविन्य या गोष्टींवर भर देण्यात आला.



१. **नाट्यमहोत्सव :** शुभारंभाचा कार्यक्रम म्हणून दि. ११ मे ते १५ मे १९७२ या काळात एक भव्य **नाट्यमहोत्सव** सादर करण्यात आला.

ची एकूण रु. १२५० ची रोख पारितोषिके व उत्तेजनार्थ प्रशस्त प्रत्रके देण्यात आली. स्पर्धेचे उद्घाटन श्री. **मोहन वाघ** यानी केले. समारोप व बक्षिस समारंभ श्रेष्ठ साहित्यिक श्री. **रणजित देसाई** यांच्या हस्ते झाला. स्पर्धेच्या निमित्ताने प्रकाशित करण्यांत आलेल्या स्मरणिकेसाठी सुप्रसिद्ध नाटककार श्री. **रत्नाकर मतकरी** यानी 'एकांकिका – काही विचार' हा खास प्रसंगोचित लेख लिहून दिला. पहिल्याच प्रयत्नात एवढया मोठ्या स्वरुपात स्पर्धांची उभारणी करणे म्हणजे एक आव्हानच होते. आलेल्या अनंत अडचणींवर मात करून कार्यकारी मंडळाने प्रयत्नांची पराकाष्ठा केली व एक भव्य कार्यक्रम शंभर टक्के यशस्वी केला.

**एस. एस. सी. विद्यार्थी मार्गदर्शन व्याख्यानमाला :**

प्रथम वर्षीच सुरू करण्यात आलेला हा आणखी एक उपक्रम. केवळ मनोरंजन हे संस्थेचे उद्दीष्ट नसल्यामुळे समाजोपयोगी सेवेला अनन्यसाधारण महत्व आहे. शिक्षण क्षेत्रात काही भरीव कामगिरी करून दाखविण्याच्या आगामी योजनांची एक छोटीशी सुरूवात म्हणून या एस. एस. सी. विद्यार्थी मार्गदर्शन व्याख्यानमालेकडे पाहाता येईल. दिनांक १० फेब्रुवारी ते १२ फेब्रुवारी पर्यंत पाटकर महाविद्यालयात महत्वाच्या आठ विषयांवर मुंबईतील शिक्षकांची व्याख्याने झाली. या तज्ञ व अनुभवी व्याख्यात्यांनी आपापल्या विषयावर माहितीपूर्ण विवेचन केले. अभ्यासक्रमातील खाचाखोचा, महत्वाचे प्रश्न, अभ्यासाची रुपरेषा व उत्तरपत्रिका लिहिण्याचे तंत्र या सर्व अंगांवर उपयुक्त सूचना केल्या. विद्यार्थ्यांमध्ये एक नवा आत्मविश्वास व उमेद निर्माण केली. प्रत्येक व्याख्यानास सरासरी ४०० विद्यार्थ्यांनी उपस्थित राहून व्याख्यानमालेस घवघवीत यश प्राप्त करून दिले. पुढे मार्चमध्ये शालान्त परीक्षा आटोपल्यावर कार्यकारी मंडळाने केलेल्या पहाणीचे वेळी बहुसंख्य विद्यार्थ्यांनी व्याख्यानमालेमुळे मोठा लाभ झाल्याचे सांगितले. तेव्हा हा उपक्रम या पुढे अधिक व्यापक करण्याचा मानस आहे.

**एस. एस. सी. च्या मानकऱ्यांना पारितोषिके :** या वर्षी पासून (मार्च १९७३) गोरेगांवातील मराठी माध्यमाच्या शाळेतून मार्च महिन्यांतील शालान्त परीक्षेत सर्वाधिक गुण मिळवून उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्याला पारितोषिक देऊन त्याचा सत्कार करण्याचा उपक्रम संस्था सुरु करीत आहे. अशा पारितोषिकांमुळे विभागांतील हुशार विद्यार्थ्यांना उत्तेजन व सहाय्य मिळते. या योजनेस अधिक बळकटी आणण्यासाठी निरनिराळया विषयांकरितां वैयक्तिक पारितोषिकें ठेवण्यास जर शिक्षणप्रेमी दानशूर मंडळी पुढे आली तर संस्था त्यांचे स्वागतच करील.

**स्मरणिका: अर्थार्जनाचे प्रभावी साधन :**

कुठल्याहि सार्वजनिक संस्थेस स्थैर्य प्राप्त होण्याकरीतां आर्थिक स्थिती मजबूत होणे आवश्यक ठरते. सभासद वर्गणीचा विनियोग बहुश: सभासदांना कार्यक्रम देण्यांतच होत असल्यामुळे अनेक लोकोपयोगी सेवा निधीअभावी प्रत्यक्षात आणणे दुरापास्त होते. त्याच प्रमाणे काही कार्यक्रमांचे



# प्रथम वर्धापनदिन संमेलन



**'प्रबोधन गोरेगांव'** संस्थेचे प्रथम वर्धापन-दिन संमेलन **गुढीपाडव्याला** (४ एप्रिल) मोठ्या थाटामाटांत पार पडले. तुडुंब भरलेले सभागृह, आकर्षक सजावट, रंगतदार कार्यक्रम व समयोचित भाषणे ही या संमेलनाची वैशिष्ट्ये होती. संमेलनाचे प्रमुख पाहुणे श्री. **बाळासाहेब ठाकरे** आपल्या भाषणांत म्हणाले, '**प्रबोधन गोरेगांव**' सारख्या राजकारणापासून अलिप्त अशा सेवाभावी संस्थांची आज नितांत आवश्यकता आहे. संस्थेचे आजवरचे कार्य व पुढील कार्यक्रम प्रशंसनीय आहेत. मात्र अधिक व्यापक व समाजोपयोगी उपक्रम अंगिकारणे आवश्यक आहे. ॲम्ब्युलन्स सारखी सेवा किंवा शालान्त परीक्षेनंतर काय ? या साठी तरुणांना प्रत्यक्ष सहाय्य या कार्यकर्त्यांनी करावे. मराठी तरुणांनी केवळ कारकुनीच्या मागे न लागता कर्तृत्वाची विविध क्षेत्रे धुंडाळावित व पुढे यावे' असे आवाहन करून त्यांनी प्रबोधनच्या कार्यास शुभेच्छा व्यक्त केल्या व आपल्याकडून शक्य ते सहाय्य देण्याचे जाहिर केले.

प्रास्ताविकात संस्थेचे प्रमुख कार्यवाह श्री. **सुभाष देसाई** यानी वर्षभरातील कार्याचा आढावा घेऊन पुढील उपक्रमांची माहिती दिली. पहिल्याच वर्षा संस्थेने दाखविलेल्या धडाडीमुळे गोरेगांवकर नागरिकानी प्रबोधनवर अलोट प्रेम केले. आणि म्हणूनच आजरोजी संस्थेच्या सभासदांची संख्या ४०० च्या घरांत येऊन ठेपली आहे. केवळ करमणूक प्रधान कार्यक्रम देणे हे संस्थेचे उद्दीष्ट नसून समाजाच्या प्रत्यक्ष उपयोगी पडणारे विविध उपक्रम व सेवा उपलब्ध करुन देणे याला प्राधान्य आहे. विविध कला-गुणांनी युक्त अशा कार्यकर्त्यांच्या जोरावर '**प्रबोधन**' गोरेगांवकर नागरिकांची भरीव सेवा करू शकेल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

## आ श्र य दा ते

१. श्री. निळकंठ उर्फ भाई सावंत

२. श्री. शरद गुप्ते

३. डॉ. विरेंद्र धुरी

## आ जी व स भा स द

१. श्री. पद्माकर देसाई
२. „ सुभाष देसाई
३. „ वसंत तावडे
४. „ मुकुंद चव्हाण
५. „ मनोहर अदवानकर
६. „ सुरेश सैतवडेकर
७. „ गणपतराव सारंग
८. „ रघुनाथ परब
९. „ मधुसूदन भिडे
१०. „ सदाशिव तावडे
११. „ महादेव खानोलकर
१२. „ सोपानदेव राणे
१३. „ रमेश म्हात्रे
१४ „ सुरेश चव्हाण
१५. कु. शांता प्रभू
१६. श्री. नरसिंह पाटील
१७. „ सदानंद मोहोळ
१८. „ सीताराम पोयरेकर
१९. „ दिनकर मालवणकर
२०. „ प्रकाश ब्रम्हे
२१. „ अनंत फाटक
२२. „ सुभाष पारकर
२३. „ विलास देवरुखकर
२४. „ राजाराम सावंत
२५. „ अरविंद सोवनी
२६. „ यश केरकर
२७. „ रमेश जंगम

---

→

या संमेलनात सादर झालेले सर्वच कार्यक्रम अतिशय रंगले. रामदास पाध्ये यांच्या बोलक्या बाहुल्या, ८ वर्षाची चिमुरडी गायिका कु. साधना घाणेकर हिचे गायन व सदानंद जोशी यांची नकला प्रात्यक्षिके आणि मुकाभिनय हे कार्यक्रम बहारदार झाले. विविध भारतीवरील सुप्रसिद्ध जाहिरात निवेदक श्री. दिलीप मळेकर यांनी आपल्या आकर्षक निवेदनाच्या जोडणीने एकूण समारंभास आगळीच खुमारी आणली. या प्रसंगी व्यासपीठावर साकारलेल्या आकर्षक, अभिनव व प्रसंगोचित सजावटीची सर्वच उपस्थितांनी मुक्त कंठाने प्रशंसा केली. सजावटीची कल्पना व रचना संस्थेच्या कार्यकारी मंडळाचे सदस्य श्री. **ग. स. सारंग** यांची होती.

प्रारंभी कार्याध्यक्ष श्री. **पद्माकर देसाई** यांनी पुष्पहार अर्पण करुन प्रमुख पाहुण्यांचे स्वागत केले. उपाध्यक्ष श्री. **शरद गुप्ते** यांनी आभार मानले.

या प्रसंगी संस्थेचे अध्यक्ष श्री. **भाईसाहेब सावंत** यांचे हस्ते श्री. बाळासाहेब ठाकरे यांचा शाल व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. भाय. वी. पटेल महापालिका शाळेच्या सभागृहात सुमारे चार तास चाललेला हा सोहळा सर्व उपस्थितांच्या पसंतीस उतरला.